N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**

प्रथम खबर अहवाल

(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. **District (जिल्हा):** जळगाव **P.S.(ठाणे):** अडावद **Year (वर्ष):** 2023

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0012 **Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 28/01/2023 19:48 बजे

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |
| 2 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7(a) |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** शनिवार

**Date From (दिनांक पासून):** 28/01/2023

**Date To ( दिनांक पर्यंत):** 28/01/2023

**Time Period (कालावधी):** पहर 4

**Time From (वेळेपासून):** 12:42 बजे

**Time To (वेळेपर्यंत):** 12:42 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 28/01/2023 **Time (वेळ):** 19:24 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ**

**Entry No. (नोंद क्र.):** 017 **Date & Time (दिनांक आणि वेळ):** 28/01/2023 19:24 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):** पूर्व

**Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** अडावद,चोपडा

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** मंगल कैलास ईंगळे

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1991 (d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):** **Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **Id details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License,PAN)**

ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No.(अ. | Id Type (ओळखपत्राचा प्रकार) | Id Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No.(अ. क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | गूरूकूल नगर गोरगावले रस्ता ,ता चोपडा ,अडावद,जळगाव,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | मितावली ,ता चोपडा,अडावद,जळगाव,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):** **Mobile (मोबाइल नं.):** 91-9096224999

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | योगेश संतोष गोसावी पो कॉ ब न 1840 | | | 1. अडावद,ता चोपडा,अडावद,जळगाव, महाराष्ट्र,भारत |
| 2 | चंद्रकांत काशिनाथ कोळी होमगार्ड 1868 खाजगी ईसम | | | 1. कोळीवाडा अडावद,ता चोपडा,अडावद, जळगाव,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. मध्ये)) |
|---|---|---|---|---|

10 **Total value of property (In Rs/-)-(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

11 **Inquest Report / U.D. case No., if any (इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ. क्र.) | UIDB Number (यु.आय.डी. बी.क्र.) |
|---|---|

12 **First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

अडावद पोलीस स्टेश CCTNS गु.र.न. 12 /2023 भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम सन 1988 चे कलम 7 व 7 अ प्रमाणे मूळ तक्रारदार व फिर्यादी- मंगल कैलास ईंगळे वय 32 व्यवसाय शेतमजूरी रा. मितावली ता.चोपडा ह मू गूरूकूल नगर गोरगावले रस्ता चोपडा जि जळगाव आरोपीचे नाव व पत्ता - 1) योगेश संतोष गोसावी वय 35 व्यवसाय नोकरी , पो कॉ ब.न. 1840 नेमणूक अडावद पोलीस स्टेशन रा पोलीस लाईन अडावद पोलीस स्टेशन ता चोपडा मूळ रा गणेश पार्क हनूमान नगर ,जळगाव (खाते पोलीस विभाग , वर्ग- 3 ) 2) चंद्रकांत काशिनाथ कोळी वय 36 व्यवसाय मजूरी व होमगार्ड 1868 रा कोळीवाडा ,अडावद ता चोपडा जि जळगाव ( खाजगी ईसम )अ.घ. ता. वेळ व ठिकाणी - दिनांक 28/01/2023 रोजी 12.42 वाजता अडावद पोलीस स्टेशन ता चोपडा चे गेटजवळ सार्व. जागी.लाचेची मागणी रक्कम - 5,000 /-स्विकारली रक्कम - तडजोडी अंती 4000 /- रु ( त्यात 500 /- रु दराच्या 08 चलनी नोटा ) अ .पा . लावलेल्या.सापळा व तपास अधिकारी - एस एस पाटील पोलीस उप अधिक्षक अँन्टी करप्शन ब्यूरो जळगाव.खुलासा- दि 24/01/2023 रोजी यातील फिर्यादी यांचे आर सी बूक व आधारकार्ड हरविल्याने त्याबाबत तक्रार देण्यासाठी ते अडावद पोलीस ठाण्यात गेले होते त्यावेळी यातील आलोसे क्र . 1 योगेश संतोष गोसावी यांनी फिर्यादी यांना तू तूझ्या ट्रॅक्टर ने अडावद पोलीस स्टेशनच्या हद्दीतून रेतीची ने आण करतो सदर रेतीची ने आण करण्यासाठी तूला अडावद पोलीस स्टेशन येथील वाहतूकीची परवानगी घ्यावी लागेल व त्यासाठी तूला साहेबांकरीता दरमहा 5,000 /- रूपये माझ्याकडे द्यावे लागतील. असे सांगीतले त्यानंतर पून्हा आलोसे क्र. 01 यांनी तक्रारदार यांचे ट्रॅक्टर वरील ड्रायव्हर संदीप कोळी यांचे मोबाईल फोनवर वारंवार संपर्क साधून तूझ्या ट्रॅक्टर मालकाला वाळूचे ट्रॅक्टर अडावद पोलीस स्टेशन चे हद्दीतून चालवायचे असेल तर 5,000 /- रूपये देण्यास व मला भेटण्यास सांग असा निरोप दिला त्याबाबत फिर्यादी यांनी दि 28/01/2023 रोजी ला . प्र .वि जळगाव कार्यालयाकडे लेखी तक्रार दिली होती . सदर तक्रारीची दि 28/01/2023 रोजी ला प्र वि जळगाव पथकाने पंच साक्षीदारा समक्ष पडताळणी केली असता आलोसे क्र 01 यांनी फिर्यादी यांना अडावद पोलीस स्टेशनच्या हद्दीतून ट्रॅक्टर व्दारे वाळूची वाहतूक करू देण्याचे व त्यावर कारवाई न करण्याचे मोबदल्यात प्रथम 5,000 /- रूपये तडजोड अंती 4,000 /- रूपये लाचेची मागणी करून सदर लाच रक्कम आरोपी क्र 02 चंद्रकांत काशिनाथ कोळी यांनी आरोपी क्र 01 यांचे वतीने वर नमूद तारीख वेळी व ठिकाणी फिर्यादी यांचे कडून पंचासमक्ष स्विकारली म्हणून गून्हा. सोबत संगणीकृत केलेली फिर्याद जोडलेली आहे.

13. **Action** **Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at**
(केलेली कारवाई: बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले): **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव): JAGDISH CHINDHU KOLAMBE
**Rank** (पद): HC (Head Constable)
**No.**(क्र.): PCMH70968 **to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):
**District** (जिल्हा):
**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14. **Signature/Thumb impression of the complainant / informant.**(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court** (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Signature of Officer in charge, Police Station** (ठाणे प्रभारी अधिकाऱ्याची)
**Name** (नाव): KIRAN DAMODHAR DANDGE
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.): PBMH85896

**Attachment to item 7 of First Information Report** (प्रथम खबरीतील मुद्दा क्र. ७ ला जोडपत्र):

**Physical features, deformities and other details of the suspect/accused: ( If known /** (संशयीत/आरोपीचे (माहित असलेल्या/पाहिलेल्या) शारीरिक वैशिष्टये, व्यंग आणि इतर तपशील))

| S.No.(अ.क्र.) | Sex (लिंग) | Date/Year of Birth (जन्म | Build (बांधा) | Height (cms.) (उंची | Complexion (रंग) | Identification Mark(s) (ओळखीच्या खुणा) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | पुरुष | | | | | चेचक के दाग: NO |
| 2 | पुरुष | | | | | चेचक के दाग: NO |

| Deformities/ Peculiarities | Teeth (दात) | Hair (केस) | Eyes (डोळे) | Habit(s) (सवयी) | Dress Habit(s) (पोषाखाच्या सवयी) |
|---|---|---|---|---|---|
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| | | | | | |
| | | | | | |

| Language /Dialect (भाषा/बोलीभाषा) | Place Of (का स्थान) | | | | | Others (इतर) |
|---|---|---|---|---|---|---|
| | Burn Mark | Leucoderma (कोड) | Mole (तिळ) | Scar (व्रण) | Tattoo (गोंदण) | |
| 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| | | | | | | |
| | | | | | | |

**These fields will be entered only if complainant/informant gives any one or more particulars about the suspect/accused.**
(जर तक्रारदार/माहिती देणा-याने संशयीत/आरोपीविषयी एक किंवा त्यापेक्षा अधिक तपशील दिल्यास फक्त यातील रकान्यांची नोंद घेतली जाईल.)

फिर्याद अडावद पो.स्टे.ता.चोपडा, जि.जळगाव

दिनांक २८.०१.२०२३

**मी मंगल कैलास इंगळे, वय ३२ वर्षे, व्यवसाय शेतमजुरी रा. मितावली ,ता.चोपडा**
**ह.मु.गुरुकुल नगर,गोरगावले रस्ता,चोपडा जि.जळगांव.**

समक्ष हजर राहुन फिर्याद देतो की, मी वरील ठिकाणी माझे परिवारासह राहतो. मी दि.२७.०१.२०२३ रोजी दुपारी अॅन्टी करप्शन ब्युरो,जळगांव कार्यालयाचे पोलीस उप अधिक्षक श्री.एस.एस.पाटील यांचेकडेस भ्रमणध्वनी व्दारे अडावद येथील एका लोकसेवकाविरुध्द लाचे संबधी तोंडी तक्रार केली होती व त्यावेळी मी त्यांना दि.२८.०१.२०२३ रोजी सकाळी ०९.३० वा. अडावद ते लोणी रोडवरील नानाचे ढाब्याजवळ भेटणार असल्याचे कळविले होते.

त्याप्रमाणे मी दि.२८.०१.२०२३ रोजी सकाळी ०९.३० वा. अडावद ते लोणी रोडवरील नानाचे ढाब्याजवळ माझे मोटर सायकल सह उपस्थीत होतो. त्यानंतर काही वेळाने पोलीस उप अधिक्षक श्री.एस.एस.पाटील साहेब,दोन शासकीय पंच व सापळा पथक असे खाजगी वाहनाने सदर ठिकाणी आले. त्यानंतर पोलीस उप अधिक्षक श्री.एस.एस. पाटील साहेब यांनी त्यांची व सोबत असलेल्या दोन शासकिय पंचाची,सापळा पथकाची व माझी ओळख करून दिली. त्यानंतर मला त्यांचे खाजगी वाहनात बसवुन घेतले. तेव्हा मी माझी लाचे संबधीची तक्रार माझे स्वत:चे हस्ताक्षरात पोलीस उप अधिक्षक श्री.एस.एस.पाटील साहेब यांचे कडे लिहून दिली ती पुढील प्रमाणे

समक्ष हजर राहुन तक्रार लिहून देतो की, मी वरील ठिकाणी पत्नी व मुलाबाळांसह राहावयास असुन शेतमजुरी करून कुटुंबाचा उदरनिर्वाह करतो.

मी माहे ऑक्टोंबर २०२२ मध्ये श्रीराम फायनान्स कंपनीकडुन कर्ज घेवुन मातोश्री टॅक्टर चोपडा येथुन सोनालीका कंपनीचे ट्रॅक्टर खरेदी केले आहे. सदर ट्रॅक्टरचा क्र. एम.एच १९ ई.ए. ०७५६ असा असुन त्याचा मासिक हफ्ता नियमीत भरत आहे. सदर ट्रॅक्टरद्वारे मी पिंप्री गावाच्या हद्दीत असलेल्या तापी नदीपात्रातुन वाळु भरुन ती अडावद ता.चोपडा गावाचे परिसरात ने आण करित असतो.

दि.२४.०१.२०२३ रोजी माझे आर.सी.बुक व आधारकार्ड हरवल्याने त्याबाबत तक्रार देण्यासाठी मी अडावद पोलीस ठाण्यात गेलो होतो. तेव्हा मला सदर ठिकाणी असलेले पोलीस कॉन्स्टेबल योगेश गोसावी हे भेटले. व ते मला म्हणाले की, तु तुझ्या ट्रॅक्टरने अडावद पोलीस स्टेशनच्या हद्दीतुन रेतीची ने आण करतो. सदर रेतीची ने आण करण्यासाठी तुला अडावद पोलीस स्टेशन येथील वाहतुकीची परवानगी घ्यावी लागेल. व त्यासाठी तुला साहेबांकरिता दरमहा ५,०००/- रुपये माझ्याकडे द्यावे लागतील असे सांगुन साहेबांच्या नावाने ५,०००/- रुपयाची मागणी केली. तसेच माझे ट्रॅक्टर वरिल ड्रायव्हर संदीप कोळी यांस देखील पोलीस कॉन्स्टेबल योगेश गोसावी यांनी मागील २ ते ३ दिवसांपासून मला वारंवार फोन करुन तुझ्या ट्रॅक्टर मालकाला वाळुचे ट्रॅक्टर अडावद पोलीस स्टेशनचे हद्दीतुन चालवायचे असेल तर त्याला मला ५,०००/- रुपये देण्यास व मला भेटण्यास सांग असे सांगीतले. तसा निरोप माझा ड्रायव्हर संदीप कोळी याने मला दिला. तेव्हा माझे लक्षात आले की, माझ्या वरिल ट्रॅक्टरद्वारे अडावद पोलीस ठाण्याचे परिसरातुन वाळुची वाहतुक करु देण्यासाठी व माझे ट्रॅक्टरवर कारवाई न करण्याचे मोबदल्यात अडावद पोलीस ठाण्याचे पोलीस कॉन्स्टेबल योगेश गोसावी हे त्यांचे साहेबांचे नाव सांगुन माझे कडेस लाचमागणी करत आहेत. तेव्हा मी त्यांना माझे जवळ आता एवढे पैसे नाहीत, मी तुम्हाला नंतर येवुन भेटतो असे सांगुन मी सदर ठिकाणाहून निघुन आलो आहे.

माझी पोलीस कॉन्स्टेबल योगेश गोसावी यांना ५,०००/-रु. रक्कम देण्याची मनापासुन इच्छा नाही. परंतु मी पोलीस कॉन्स्टेबल योगेश गोसावी यांना त्यांच्या मागणी प्रमाणे त्यांना ५०००/-रुपये दिले नाही तर ते माझे ट्रॅक्टर पकडुन कारवाई करतील. म्हणुन मी पोलीस कॉन्स्टेबल योगेश गोसावी यांचे विरुध्द तक्रार देण्याचे ठरवुन त्यांना ५०००/-रुपये देण्यास तयार झालो आहे. मी पोलीस कॉन्स्टेबल योगेश गोसावी यांची भेट घेण्यास आज दि.२८.०१. २०२३ रोजी अडावद पोलीस स्टेशन येथे जाणार आहे. पोलीस कॉन्स्टेबल योगेश गोसावी यांचेशी माझा कोणत्याही प्रकारचा पैशांचा देवाणघेवाण अथवा उसनवारीचा व्यवहार नाही अथवा माझा त्यांचेशी कोणत्याही प्रकारचा वैरभाव नाही.

त्यानंतर पोलीस उप अधिक्षक श्री.एस.एस.पाटील साहेब यांनी मला व पंच क्रं. १ यांना थोडक्यात सुचना दिल्या. त्यानंतर पोलीस उप अधिक्षक श्री.एस.एस.पाटील साहेब यांनी त्यांचे कडेस असलेले डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर दाखविले व त्यामध्ये नविन मेमरी कार्ड टाकुन ते सुरु करुन सदरचे मेमरीकार्ड मध्ये माझे व दोन्ही पंचाचे वक्तव्य घेतले व सदरचे व्हॉईस रेकॉर्डर सुरु करुन ते माझे शर्टच्या आत गळयात लटकवुन दिले. त्यानंतर मला, पंच क्रं.१

दि. 28/1/23
अडावद पोस्टे
CCTNS NO
12/2023
भ्रष्टाचार प्रतिबंध
अधिनियम सन
1988 चे कलम
7 व 7(अ)
प्रमाणे 19.24 वा.
नोंद 17 वर
घेतली आहे.

पो.ठा. अं.
अडावद पो.स्टे.

ठाणे अंमलदार पोलीस स्टे. अडावद

28.1.2023

यांचेसह पोलीस कॉन्स्टेबल योगेश गोसावी यांची भेट घेण्यासाठी अडावद पोलीस स्टेशन येथे माझे मोटर सायकलने पाठविले होते.

त्यानंतर मी व पंच क्र.०१ असे सदर ठिकाणाहुन माझे मोटार सायकलने निघुन अडावद पोलीस स्टेशन येथे गेलो. तेव्हा माझी मोटर सायकल अडावद पोलीस स्टेशनचे बाहेर उभी करुन मी पोलीस कॉन्स्टेबल योगेश गोसावी यांना फोन करुन मी अडावद पोलीस स्टेशनचे गेटजवळ आल्याचे सांगीतले. त्यानंतर पोलीस कॉन्स्टेबल योगेश गोसावी हे पोलीस स्टेशन मधुन अडावद पोलीस स्टेशनचे गेटजवळ आले तेव्हा माझी त्यांचेशी भेट झाली.

तेव्हा माझे व पोलीस कॉन्स्टेबल योगेश गोसावी यांचेत माझे कामाबाबत चर्चा सुरु झाली. तेव्हा पोलीस कॉन्स्टेबल योगेश गोसावी यांनी मला " जाऊ दे भो, तु व्यस्त राहतो, मोठा माणुस आहे तु, म्हणुन तुझ्या ड्रायव्हर जवळ निरोप दिला" असे सांगीतले. तेव्हा मी त्यांना " काय मग" असे म्हणालो. तेव्हा पोलीस कॉन्स्टेबल योगेश गोसावी यांनी मला " तु का नवीन हे का, तुला माहित नाही का, दोन गाडया विकल्या तु मला माहित आहे, पाच काही विशेष नाही जे सगळयांच चालु हे तेच तुला सांगीतल हे" असे म्हणाले. तेव्हा मी त्यांना " जास्त हुई जास ना" असे म्हणालो तेव्हा पोलीस कॉन्स्टेबल योगेश गोसावी यांनी मला " एक कमी करुन टाक, पाठवुन दे त्याच्या हातात" असे म्हणाले. तेव्ही मी त्यांना पुन्हा " कितला धाडु, चारशे का चारशे का चार हजार" असे म्हणालो. तेव्हा पोलीस कॉन्स्टेबल योगेश गोसावी यांनी मला त्यांचे हाताची चार बोटे दाखवुन चार हजार रुपये बाबत ईशारा केला. त्यानंतर मी त्यांना थोडया वेळात पैसे घेवुन येतो असे सांगुन मी व पंच क्रं.१ असे सदर ठिकाणाहुन निघुन सापळा पथकाजवळ परत आलो होतो. त्यानंतर डिजीटल व्हाईस रेकॉर्डर मध्ये माझे, पोलीस कॉन्स्टेबल योगेश गोसावी यांचे सोबत झालेले संभाषण दोन्ही पंचानी, पोलीस उप अधिक्षक श्री.एस.एस.पाटील साहेब व सापळा पथकाने ऐकले. तेव्हा पोलीस कॉन्स्टेबल योगेश गोसावी यांनी माझे कडेस अडावद पोलीस स्टेशनच्या हद्दीतुन ट्रॅक्टरद्वारे वाळुची वाहतुक करु देण्याचे व कारवाई न करण्याचे मोबदल्यात माझेकडेस ५,०००/-रु.लाचेची मागणी करुन तडजोडीअंती ४,०००/- रुपयांची मागणी केल्याबाबत खात्री झाली. मी पोलीस कॉन्स्टेबल योगेश गोसावी यांना थोडया वेळात पैसे आणुन देतो असे सांगितले असल्याने व वेळ कमी असल्याने पोलीस उप अधिक्षक श्री.एस.एस.पाटील साहेब यांनी सदर सापळा कारवाई सलगपणे करण्याच्या निर्णय घेतला.

त्यानंतर पोलीस उप अधिक्षक श्री.एस.एस.पाटील साहेब यांनी मला ४,०००/-रु.हजर करण्यास सांगितले. तेव्हा मी माझे घर खर्चातुन आणलेले ४,०००/-रु त्यात ५००/-रु.दराच्या ८ नोटा पोलीस उप अधिक्षक श्री.एस.एस. पाटील साहेब यांचे समक्ष हजर केले. त्यानंतर पोलीस उप अधिक्षक श्री.एस.एस.पाटील साहेब यांनी मी हजर केलेले नोटांना अ.पा.पावडर लावुन सदरच्या नोटांची घडी करुन माझे शर्टच्या वरील डाव्या बाजुच्या खिश्यात अलगद ठेवुन दिल्या होत्या.

त्यानंतर पोलीस उप अधिक्षक श्री.एस.एस.पाटील साहेब यांनी मला व पंच क्रं.१ यांना थोडक्यात सुचना दिल्या. त्यांनतर पोलीस उप अधिक्षक श्री.एस.एस.पाटील साहेब यांनी डिजीटल व्हॉईस रेकॉर्डरमध्ये नविन मेमरी कार्ड टाकुन ते सुरु करुन माझे शर्टच्या आत गळयात लटकवुन दिले.त्यानंतर मला, पंच क्रं.१ यांचेसह पोलीस कॉन्स्टेबल योगेश गोसावी यांना लाच रक्कम देण्यासाठी अडावद पोलीस स्टेशन येथे माझे मोटार सायकलने पाठविले होते.

त्यानंतर मी व पंच क्र.०१ असे सापळा पथकापासुन माझे मोटार सायकलने निघुन अडावद पोलीस स्टेशन येथे गेलो. तेव्हा पोलीस उप अधिक्षक श्री.पाटील साहेब यांनी पोलीस स्टेशनचे आवारात सापळा लावला होता.तेव्हा मी अडावद पोलीस स्टेशनचे बाहेरुन माझे मोबाईल फोनवरुन पोलीस कॉन्स्टेबल योगेश गोसावी यांचे मोबाईल फोनवर फोन करुन मी बाहेर आलो आहे असे सांगितले. तेव्हा पोलीस कॉन्स्टेबल योगेश गोसावी हे पोलीस स्टेशन मधुन बाहेर आल्यानंतर त्यांचेत व माझ्यात इतर आवांतर चर्चा झाली. सदर चर्चे दरम्यान पोलीस कॉन्स्टेबल योगेश गोसावी यांनी लाच रक्कम होमगार्ड चंदु कोळी जवळ देण्याचे सांगीतल्याने मी माझे शर्टच्या वरील डाव्या बाजुच्या खिशात असलेली लाचेची रक्कम ४,०००/- रुपये त्यात ५००/-रु. दराच्या ८ नोटा बाहेर काढुन त्यांच्या समोर धरली असता, त्यांनी सदर लाचेची रक्कम डाव्या हाताने स्विकारून त्यांच्या पॅन्टच्या पुढील डाव्या बाजुच्या खिशात ठेवुन घेतली. त्यानंतर मी पोलीस कॉन्स्टेबल योगेश गोसावी यांना सदरची लाच रक्कम होमगार्ड चंदु कोळी जवळ दिल्या बाबत सांगीतले असता त्यांनी मानेने होकार दर्शविला. त्यानंतर मी लागलीच ठरवुन दिल्या प्रमाणे सापळा पथकास इशारा केला. तेव्हा पोलीस उप अधिक्षक श्री.एस.एस.पाटील साहेब व सापळा पथक यांनी पोलीस कॉन्स्टेबल योगेश गोसावी व होमगार्ड चंदु कोळी यांना रंगेहाथ पकडले.

त्यानंतर पोलीस उप अधिक्षक श्री.एस.एस.पाटील साहेब यांचे सुचने नुसार माझे गळयातील डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर बाहेर काढुन ते बंद केले. तेव्हा पोलीस उप अधिक्षक श्री.एस.एस.पाटील साहेब यांनी पोलीस कॉन्स्टेबल योगेश गोसावी व होमगार्ड चंदु कोळी यांना आपली स्वत:ची तसेच सापळा पथकाची ओळख सांगितली. त्यानंतर पोलीस उप अधिक्षक श्री.एस.एस.पाटील साहेब यांनी पोलीस कॉन्स्टेबल योगेश गोसावी त्यांचे पुर्ण नाव, गांव व पत्ता विचारला

28.1.2023

असता त्यांनी त्यांचे नाव पोकॉ/१८४० योगेश संतोष गोसावी, वय–३५, व्यवसाय नोकरी, अडावद पोलीस स्टेशन, रा. पोलीस लाईन अडावद पोलीस स्टेशन,ता.चोपडा,जि.जळगाव असे सांगितले.

त्यानंतर पोलीस उप अधिक्षक श्री.एस.एस.पाटील साहेब यांनी होमगार्ड चंदु कोळी यांना त्यांचे पुर्ण नाव, गांव व पत्ता विचारला असता त्यांनी त्यांचे नाव चंद्रकांत काशिनाथ कोळी, वय–३६, व्यवसाय मजुरी व होमगार्ड १८६८,रा. कोळी वाडा, अडावद,ता.चोपडा,जि.जळगाव असे सांगितले.

त्यानंतर सापळा पथकाने त्यांना ताब्यात घेतले. त्यानंतर पुढील ॲन्टी करप्शन ब्युरो कार्यालय जळगाव येथे करण्यात आली असुन तसा सविस्तर पंचनामा केला आहे.

अशा प्रकारे आरोपी पोकॉ/१८४० योगेश संतोष गोसावी, वय–३५, व्यवसाय नोकरी, अडावद पोलीस स्टेशन, रा. पोलीस लाईन अडावद पोलीस स्टेशन,ता.चोपडा,जि.जळगाव व चंद्रकांत काशिनाथ कोळी, वय–३६, व्यवसाय मजुरी व होमगार्ड १८६८,रा. कोळी वाडा, अडावद,ता.चोपडा,जि.जळगाव यांनी दि.२८.०१.२०२३ रोजी पंचासमक्ष मला अडावद पोलीस स्टेशनच्या हद्दीतुन ट्रॅक्टरद्वारे वाळुची वाहतुक करु देण्याचे व त्यावर कारवाई न करण्याचे मोबदल्यात माझेकडेस ५,०००/–रु.लाचेची मागणी करुन तडजोडीअंती ४,०००/– रुपयांची मागणी करुन सदरची लाच रक्कम पोकॉ/१८४० योगेश संतोष गोसावी यांचे सांगणे प्रमाणे होमगार्ड चंद्रकांत काशिनाथ कोळी यांनी अडावद पोलीस स्टेशनचे गेट जवळ स्विकारली म्हणुन माझी त्यांचे विरुध्द कायदेशीर फिर्याद आहे.

माझी वरील नमुद फिर्याद मी वाचुन पाहिली ती माझे सांगणे प्रमाणे ॲन्टी करप्शन ब्युरो जळगाव कार्यालयातील संगणकावर टंकलीखीत केली असुन ती बरोबर व खरी आहे.

**समक्ष** **फिर्यादीची सही**

28.1.2023

शशिकांत श्रीराम पाटील
पोलीस उप अधिक्षक
ॲन्टी करप्शन ब्युरो,जळगांव